# मुंबई विद्यापीठ
## विद्यार्थी कल्याण विभाग

क्र. वि.क.वि./७५/२०१६

डॉ. मनाली लोढे.
संचालक,

विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'ब' पथ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

परिपत्रक :

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ करीता मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणा-या [पुस्तकपेढी] उपक्रमास मिळणा-या विद्यापीठ अनुदानाविषयी.

---

महोदया/महोदय,

विद्यापीठ विभागातील विभागप्रमुख व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाचे/संस्थांचे प्राचार्य/संचालक/ अधिष्ठाता यांना कळविण्यात येते की मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे वर नमूद केलेल्या योजनेखाली दर शैक्षणिक वर्षाकरीता अनुदानाची तरतूद केली जाते व त्यातून विद्यापीठ विभागात/महाविद्यालयात/संस्थेंत प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार त्या विद्यापीठ विभागाने महाविद्यालयाने/ संस्थेने विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाकडे तशी मागणी केल्यास पुस्तकपेढी योजनेखाली अनुदानित रक्कमेचे वाटप केले जाते.

उपरोल्लेखित विषयांतर्गत २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाकरीता ज्या शैक्षणिक संस्थांना अनुदान घेण्याची इच्छा आहे त्यांनी अनुदान मिळण्याच्या दृष्टीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या माहितीचा सोबत जोडलेला तक्ता भरुन संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांच्याकडे **शुक्रवार, दिनांक ३० सप्टेंबर २०१६** पर्यन्त किंवा त्याच्या अगोदर पाठविण्याची व्यवस्था करावी म्हणजे पुढील कार्यवाही करुन त्यासंबंधीच्या सल्लागार समितीने अनुदान मंजुर केल्यास सदर विद्यापीठ विभाग/महाविद्यालय/संस्था त्यांच्या विद्यार्थी संख्येनुसार अनुदानाचे वितरण करण्याचे आदेश निर्गमित केले जातील.

ज्या विद्यापीठ विभागांना/महाविद्यालयांना/संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ करीता वरील योजनेखाली अनुदानाचे वितरण करण्यात आले होते त्या विभागांनी/महाविद्यालयांनी/संस्थांनी कृपया वितरीत झालेल्या अनुदानाचे २०१६-२०१७ चे लेखा अहवाल ताबडतोब पाठवावे अशी विनंती केली होती. शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ किंवा त्यापूर्वीचे लेखा अहवाल या विभागास सादर केल्याशिवाय २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षासाठी अनुदान वितरीत करणे शक्य होणार नाही. याची संबंधीत विभागांनी/महाविद्यालयांनी/संस्थांनी कृपया नोंद घ्यावी.

सदर योजना विद्यापीठ विभागात/महाविद्यालयात/ संस्थांना राबविण्यासंबंधी मार्गदर्शक प्रणाली सोबत जोडली आहे. त्याची अंमलबजावणी करावी ही विनंती,

Manali

( डॉ. मनाली लोढे )
संचालक

मुंबई - ४०० ०२०
दिनांक : २४ जुन,२०१६

प्रत : विद्यापीठ विभागाचे प्रमुख व संलग्नित महाविद्यालयाचे व संस्थेचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांना त्यांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.